# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे
कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे
दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


प्रेस नोट क्र-१६१ दिनांक - २७/०४/२०२४

## Telegram च्या माध्यामातुन मैत्री करुन ऑनलाईन फसवणूक झालेली रक्कम १,१८,०००/- रुपये परत करण्यात सायबर पोलीस ठाणेस यश !!

मिरा-भाईंदर,वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील कार्यक्षेत्रातील मिरारोड पोलीस ठाणेचे हद्दीतील तक्रारदार नामे श्रीमती. समीरा यांची टेलीग्राम ॲपवर एका अनोळखी इसमाशी मैत्री झाली. सदर इसमाने तक्रारदार यांचा विश्वास संपादन करुन वेळोवेळी पैशांची मागणी केली. तक्रारदार यांनी देखील त्याचेवर विश्वास ठेवुन एकुन १,२०,०००/- रु त्यास ऑनलाईन पाठविले. त्यानंतर संशयीत इसमाने तक्रारदार यांचेशी कोणताही संपर्क केला नाही. त्यावर आपली फसवणुक झाल्याचे तक्रारदार यांचे लक्षात आल्याने **सायबर पोलीस ठाणे आवक अर्ज क्रमांक ९९८-बी/२०२४ दिनांक २०/०४/२०२४ अन्वये तक्रारी अर्ज प्राप्त करण्यात आला आहे.**

नमूद तक्रारीबाबत तात्काळ दखल घेवून तक्रारदार यांचे झाले व्यवहाराबाबत माहिती प्राप्त करण्यात आली. सदरची फसवणूक रक्कम **Axis Bank** च्या खात्यात जमा झाल्याची माहिती प्राप्त करण्यात आली. तक्रारदार यांची रक्कम तात्काळ गोठविण्याबाबत तसेच तक्रारदार यांचे मुळ खात्यावर परत जमा होणेकरीता पत्रव्यवहार करण्यात आलेला आला.सायबर पोलीस ठाणेकडून तात्काळ केलेल्या पत्रव्यवहार व पाठपुराव्यामुळे सदरची **फसवणूक १,१८,०००/- रुपये** पुन्हा तक्रारदार यांचे मुळ खात्यावर परत मिळविण्यात आली.

**अशा प्रकारची फसवणूक टाळण्यासाठी घ्यावयाची काळजी...**

- **Telegram च्या माध्यामातुन प्राप्त माहितीद्वारे कोणत्याही आर्थिक व्यवहार करुन नये.**
- **आपले बँक खाते, जन्मदिनांक, OTP वा इतर वैयक्तीक माहीती उघड करु नये.**
- **अनोळखी लिंक, ॲप्लीकेशन डाऊनलोड करु नये.**
- **ऑनलाईन फसवणूक झाल्यास तात्काळ बँकेला संपर्क करावा.**

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील नागरीकांना आवाहन करण्यात येते की, अशा प्रकारे फसवणूक करणे कायदयाने गुन्हा आहे. असा प्रकार आपल्यासोबत घडला असल्यास तात्काळ नजीकच्या पोलीस ठाणेस, सायबर गुन्हे कक्षास संपर्क साधावा. तसेच www.cybercrime.gov.in अथवा 1930 या हेल्पलाईनवर संपर्क साधून तक्रार द्यावी.**

सदरची कामगिरी श्री.अविनाश अंबुरे, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री. मदन बल्लाळ, सहा.पोलीस आयुक्त (गुन्हे), मि.भा.व.वि.पोलीस आयुक्तालय यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री.सुजितकुमार गुंजकर, सपोनि/ स्वप्नील वाव्हळ,पोउपनिरी/प्रसाद शेनोळकर,मपोअं/१३०८७ अमिना पठाण, मपोअं/१६३०६ सुवर्णा माळी, मपोहवा/१२००७ माधुरी धिंडे, पोअं/राहुल बन, पोअं/ विलास खाटीक,पोअं/कुणाल सावळे, यांनी पार पाडली आहे.

सायबर पोलीस ठाणे व्हॉट्सॲप हेल्पलाईन क्रमांक :- ९०० ४८८ ०१३५
सायबर पोलीस ठाणे ई-मेल आयडी :- **cybercrime.mb-vv@mahapolice.gov.in**

----0000----